# प्रकरण ३ रे

# स्वातन्त्र्येतिहासपर आणि तत्त्वदर्शनपर साहित्य

## प्रकरण 3 रे

## - स्वातन्त्र्येतिहासपर आणि तत्त्वदर्शनपर साहित्य -

1947 नंतर संस्कृतमध्ये जे साहित्य निर्माण झाले त्यामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ज्यांनी आपल्या सर्वस्वाचे बलिदान दिले अशा हुतात्म्यांची चरित्रे पूर्वकालीन संत, देशभक्त,क्रांतिकारक,शूरवीर यांची चरित्रे ज्याप्रमाणे निर्माण झाली. त्याचप्रमाणे भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगणारे साहित्यही निर्माण झाले. आता स्वातंत्र्येतिहास सांगणा-या काव्यांचा परामर्श घेत आहे.

### - भारतस्वातन्त्र्यम् -

**- श्री. कृ.वा.चितळे**

1962 साली चीन आक्रमणानंतर राष्ट्रपतींनी राष्ट्र संकटात असल्याची घोषणा केली तेव्हा दीर्घ काळाच्या प्रयत्नांनंतर मिळविलेल्या स्वातंत्र्याचा विचार मनात येऊन केवळ स्वसुख पाहणा-या लोकांच्या मनात राष्ट्रहित जागृत करावे या विचाराने श्री.कृ.वा.चितळे यांनी " भारतस्वातन्त्र्यम् " हा ग्रंथ लिहिला. " येन केन प्रकारेण" स्वत:ची उपजीविका चालविणे किंवा स्वसुखात भर घालणे यातच स्वातंत्र्योत्तर काळात लोक गुंगुन गेले होते. चीन सारखा देश आक्रमण करू पाहत होता. अशा स्थितीत स्वातंत्र्यासाठी तन मन धन अर्पण करणा-यांच्या कार्याचा आढावा घेऊन समाजात जागृती करावी.हा श्री. चितळे यांचा ग्रंथरचनेमागचा हेतू आहे.

स्वातंत्र्यासाठी आमच्या पूर्वजांनी स्वार्थत्याग करून,कोणते मूल्य देऊन स्वातंत्र्य मिळविले. हे परकीय आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर संस्कृत वाचकांना समजावून देणे, त्याचप्रमाणे संस्कृत भाषेचा प्रसार करणे हा या ग्रंथलेखनाचा हेतू आहे.

" भारतातील राजनैतिक प्रवाहाचे ज्ञान करून देणारा ऐतिहासिक ग्रंथ" असे स्वरूप असलेला " भारतस्वातनत्र्यम्" हा ग्रंथ आहे. जरी या ग्रंथामध्ये भारताचे भौगोलिक,सांस्कृतिक आणि धार्मिक वर्णनही आले असले तरी लेखकाचा मुख्य हेतू भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगणे हाच आहे. सात अध्याय असलेल्या या ग्रंथाचे " स्वातन्त्र्येतिहाससप्ताध्यायी" असेही नांव प्रचलित आहे.

जेव्हा एखाद्या राष्ट्राच्या जनतेमध्ये आपल्या राष्ट्राविषयीचा स्वाभिमान तीव्रतेने जागृत होतो,राष्ट्रीय निष्ठा प्रखर बनते, तेव्हा त्या राष्ट्रातील लोक स्वतंत्र राष्ट्रनीतीचा अवलंब करतात.

आपल्या राष्ट्रामध्ये विदेशी लोकांचा हस्तक्षेप त्यांना रुचत नाही आणि मग परकीय सत्तेचे,समूळ उच्चाटन करण्यासाठी ते राष्ट्रप्रेमी लोक आपले सर्वस्व देखील देशासाठी अर्पण करतात. त्यासाठी त्यांनी केलेली सर्व कृत्ये राष्ट्रीय भावनेची द्योतक असतात. आणि अशा राष्ट्रीय कार्याचे वर्णन करणारे ग्रंथ राष्ट्रीय भावनेने ओतप्रोत असतील यात शंकाच नको. "भारतस्वातन्त्र्यम्" हा ग्रंथ देखील राष्ट्रीय भावनेने परिपूर्ण आहे.

लेखकाने भारताच्या भौगोलिक सीमांचे वर्णन अत्यंत आत्मीयतेने केलेले आहे[1] त्यामुळे विभिन्नतेतून ऐक्य भावना निर्माण होते. भारताच्या कोणत्याही भागात जरी आपण असलो तरी इतर प्रांतांविषयी आपल्या मनांत आत्मीयता निर्माण होते. 1857 मधील स्वातंत्र्य लढ्याचे वर्णन वाचताना वाचकांच्या मनांत देशभक्तीचे पडसाद उमटतात. राष्ट्रीय नवचैतन्य निर्माण होते.झांशीची राणी,तात्या टोपे,नानासाहेब पेशवे वगैरे क्रांतिकारकांच्या राष्ट्रभावना जाणून त्यांच्याविषयीची श्रध्दा, आदर आणि अभिमान तर दुणावतोच पण शिवाय स्वदेशाभिमानही वृध्दिंगत होतो.[2]

लेखकाने ब्राह्मोसमाज,प्रार्थनासमाज,आर्यसमाज, यांच्या कार्याची ओळख करून दिली आहे. त्यांनी केलेल्या समाजपरिवर्तनाचे ज्ञान वाचकांना लेखकाने करून दिले आहे.राष्ट्राच्या प्रगतीमध्ये समाज-सुधारणेला असलेले अनन्यसाधारण महत्त्व पाहता,समाजाला जाग आणण्यासाठी, आपापसात समभाव, बंधुभाव,प्रेम व ऐक्य निर्माण करण्यासाठी या समाजसंस्थांनी केलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करणारा तर आहेच,परंतु तो राष्ट्रीय भावनेला प्रेरकही आहे. समाजामध्ये राष्ट्रीय-भावना जागृत करण्याचा लेखकाचा हा प्रयत्न आहे.[3]

इंग्रजांच्या दास्यातून भारताची मुक्तता करण्यासाठी दिल्या गेलेल्या लढ्यांचे वर्णन विस्ताराने केलेले आहे. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय,मदनलाल धिंग्रा,सावरकर,चिदंबर पिल्ले, सुभाषचंद्र,गांधी,नेहरू,वल्लभभाई पटेल वगैरे राष्ट्रभक्तांच्या सर्वस्व समर्पणाचे वर्णन वाचून वाचकांच्या मनात स्फूर्ती निर्माण होते. राष्ट्रप्रेमाने मन भारावून जाते.[4]

याशिवाय लेखकाने स्वतंत्र भारताची मुद्रा,राष्ट्रध्वज,राष्ट्रगीत आणि वन्देमातरम् यांचेदेखील राष्ट्रीयभावोत्तेजक वर्णन केलेले आहे. लेखकाच्या मते ही सर्व भारताची सन्मानचिन्हे आहेत[5].

याशिवाय लेखकाने स्वतंत्र भारताची मुद्रा,राष्ट्रध्वज,राष्ट्रगीत आणि वन्देमातरम् यांचेदेखील राष्ट्रीयभावोत्तेजक वर्णन केलेले आहे. लेखकाच्या मते ही सर्व भारताची सन्मानचिन्हे आहेत.[5]

त्यानंतर 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले असता भारतीयांनी त्यांचा केलेला पराभव वर्णन करुन भारतीयांच्या मनामध्ये राष्ट्रीयभावना दृढमूल केलेली आहे.[6]

अशा प्रकारे हा ग्रंथ आद्यन्त राष्ट्रीय भावनेने परिपूर्ण आहे. यामध्ये आलेल्या काही सुभाषितवजा पंक्ती, की ज्यामध्ये लेखकाचे मातृभूप्रेम, स्वधर्म, स्वसंस्कृती, देशसेवक, राष्ट्रभक्त या सर्वांविषयीचा आदर व्यक्त होतो. लेखकाची राष्ट्रनिष्ठा प्रकट होते.

1. परदास्यविनाशाय मातृभूम्याः प्रयत्नतः ।
   यापितं जीवनं यैस्तान् गातुं मे दीयतां मतिः ।।[7]
2. भारतस्वातन्त्र्यगीतगानं भारतीयान् चेतयेते ।।[8]
3. भारतस्वातन्त्र्यं नाम विश्वेषां भारतीय जनानां जीवात्मतत्त्वम् ।[9]
4. भारतराष्ट्रगीतश्रवणेन भारतीयानां शरीरं पुलकायते ।[10]
5. मातृभूमिवन्दनं कदापि न दोषाय् ।[11]
6. एकीभूय राष्ट्रकार्यं कर्तव्यम् ।[12]
7. मातृभूमिरक्षणार्थं बध्दपरिकरा भूत्वा यतेमहि ।[13]
8. स्वराष्ट्राभ्युदयनिष्ठा आवश्यकी ।[14]

**– स्वराज्यविजयः –**

**पं. क्षमा राव**

महात्मा गांधींच्या संपूर्ण जीवनाबरोबरच स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासाचे वर्णन करणारे हे महाकाव्य 45 सर्ग आणि 1740 श्लोकांचे आहे. या महाकाव्याची रचना पंडिता क्षमा राव यांनी केली आहे.

भारत पाकिस्तान फाळणीच्या वेळच्या निर्णायक क्षणांच्या चित्रणाने महाकाव्याची सुरवात होते.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत अविश्रांत प्रयत्न करीत राहण्याची गांधींची वृत्ती पुढील श्लोकातून दिसते.

" आदास्यबन्धानिर्मुक्ते रास्वातन्त्र्यफलोदयम् ।
नास्ति भोः मम विश्रांतिः प्राणेभ्यो जन्मभूः प्रिया ।।"[15]

सॅन्फ्रान्सिस्को येथे सभेमध्ये गांधीजींनी जे प्रस्ताव मांडले ते पाहता त्यांच्या केवळ राष्ट्रहिताच्याच नव्हे तर विश्वाविषयीच्या मंगल भावना व्यक्त होतात.[16]

पूर्ण स्वराज्य प्राप्तीनेच देशाचे कल्याण होणे शक्य आहे आणि म्हणूनच संपूर्ण स्वातंत्र्य त्यांना मिळवायचे होते.[17]

राष्ट्रयज्ञामध्ये प्रत्येक नागरिकाचे स्वसामर्थ्यानुसार योगदान आहे. लोकांनी स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडामध्ये यथाशक्ती आहुती टाकलेली दिसून येते. कलकत्त्याहून परतणा-या गांधींना एका धनिकाने जसे चांदीचे भांडे दिले [18] तसेच एका गरीब वृध्देने दोन आणे श्रध्देने दिले.[19]

कोणत्याही राष्ट्राच्या राष्ट्रीयतेत भाषेला असलेले अनन्यसाधारण महत्त्व गांधीजींनी ओळखले होते. आणि म्हणूनच सभेमध्ये इंग्रजीतून भाषण करणारांना ते एकतर राष्ट्रभाषेतून किंवा लोकभाषेतून भाषण करण्याचा सल्ला देत.[20] या काव्यात कवयित्रीचे राष्ट्रभाषा हिंदी वरील प्रेमही व्यक्त होते.[21]

राम, तुळशी, गंगा आणि गीता यांच्या विषयीची देखील कवयित्रीची आस्था प्रकट होते.[22] तसेच राष्ट्रभक्तांविषयीही सन्मान प्रदर्शित केलेला दिसून येतो.[23] हिंदू मुस्लीम ऐक्याच्या प्रयत्नांचे वर्णन केलेले आहे. भारताची राष्ट्रीय एकता खंडित होऊ नये हा त्यामागचा हेतू स्पष्ट दिसतो.

विशाखापट्टणमध्ये एका सभेमध्येबोलतांना स्वराज्य प्राप्तीसाठी तीन आवश्यक गोष्टी गांधींनी सांगितल्या आहेत.

" पूर्वमस्पृश्यताव्याधे निर्मूलनमशेषात: व्दितीयं सर्वजातीना ।
मैक्यमत्येन वर्तनम् तृतीयमादिवासिभ्य: समभोगाधिकारिता ।। [24]

भारतीय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना उद्दीप्त करण्याच्या हेतूने या काव्यामध्ये एक आचारसंहिता सांगितली आहे. आजही प्रत्येक भारतीयास आचरणीय अशी ही आचारसंहिता पुढीलप्रमाणे आहे.

" देशभक्तांवर इंग्रज शासनाकडून केल्या गेलेल्या अत्याचारांचा निषेध म्हणून विद्यार्थ्यांनी इंग्रजी शाळामधून शिक्षण घेणे बंद करावे, स्वदेशी खादीचा वापर करावा, विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकावा, सूत कातावे, ज्यांची आपल्या राष्ट्रीय ध्वजावर निष्ठा नाही अशांच्या हाती चुकून देखील ध्वज देऊ नये, अशा लोकांना आपले राष्ट्रीय गीत देखील म्हणू देऊ नये. ग्रामीण लोकांची सेवा करण्याचे व्रत स्वीकारावे, आपल्या राष्ट्रभाषेचे अध्ययन करावे, राष्ट्रभाषेचा प्रसार करावा, आपले आचरण स्पृहणीय आणि अनुकरणीय ठेवावे. विदेशी लोकांच्या तावडीतून आपल्या मातृभूमीला मुक्त करण्यात कार्यरत रहावे, महिलांचा सन्मान करून त्यांचे रक्षण करावे, आपल्या राष्ट्राविषयीचे दायित्त्व

पूर्ण करण्याबाबत मागेपुढे पाहू नये. आळशी न होता वेळेचा सदुपयोग करावा."[25]

मानवी मूल्यांच्या स्थापनेसाठी क्षमा राव यांचे साहित्य निर्माण झालेले दिसून येते. स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील कालखंडाचे वर्णन करून कवयित्रीने आपले स्वराज्यप्रेम व्यक्त केले आहे. राष्ट्र-प्रेमाबरोबरच पं.क्षमाराव यांची गांधींच्या तत्त्वज्ञानावरील निष्ठांहीव्यक्त होते. गांधींवरील त्यांची श्रध्दा या काव्यातून प्रकट होते.

**- भारतीय स्वातन्त्र्योदय : (हस्तलिखित)**

**- श्री. विश्वनाथ छत्रे**

इ.स.1857 ते 1948 पर्यंतच्या कालखंडात घडलेल्या प्रसंगावर श्री. विश्वनाथ छत्रे यांनी " भारतीय स्वातन्त्र्योदय:" हे काव्य लिहिले आहे,याचे सहा पर्व असून 403 श्लोक आहेत.यातील प्रत्येक पर्वाला नाव आहे;क्रान्तिपर्व,लोकमान्य पर्व, गांधी पर्व, सुभाष पर्व, राष्ट्रसभा पर्व, स्वातन्त्र्योदय पर्व.

महाकाव्याच्या सुरवातीला कवी म्हणतो- पारतंत्र्याच्या दु:खाने व्यथित,असंख्य तपस्व्यांच्या प्राथनेनंतर शेकडो वर्षांपासून अस्ताला गेलेला स्वातंत्र्यसूर्य उदित झाला".[26]

अगणित हुतात्म्यांच्या नामस्मरणातील असमर्थता व्यक्त करून कवी 1857 पासून स्वातंत्र्यापर्यंत राष्ट्राच्या कामी आलेल्या सर्वज्ञात अशा वीरांचे पुण्यस्मरण करतो. त्यांच्या शौर्यगाथांची स्मृतीजागवितो. तत्कालीन जनतेने आपली आवड,ऐपत आणि संधीनुसार स्वातंत्र्य यज्ञात विविध प्रकारे आहुती दिली त्याचे स्मरण कवीने कृतज्ञतेने केले आहे.[27]

लोकमान्यपर्वात टिळकांना समर्पित ही काव्य पुष्पांजली मर्मस्पर्शी आहे.

" अधीत्योच्चां विद्यामपि परिजहौ मान्धानन्दां
य आँग्लानां सेवां हतमतिजनोज्जागरकृते ।
स्वराज्यप्राप्त्यै यो ऽगमयदखिलायुर्विगणयन्
निबन्धं निन्दां वा जयतु स चिरं केसरिकर: ।।"[28]

**टिळकांच्या मृत्युनंतर** राष्ट्रीय आंदोलनात गांधींचा प्रवेश झाला.सत्याग्रह,विदेशी वस्तु बहिष्कार आणि सविनय कायदेभंग चळवळ ही गांधींची अस्त्रे तत्कालीन दुर्बल भारतीयांसाठी उचितच होती. कारागृहे म्हणजे भारतीय राष्ट्रसेवकांना तीर्थक्षेत्रे वाटत होती. त्यादृष्टीने कवीची ही उपमा यथोचित आहे.

" काराश्च सत्याग्रहिभिस्त्वशोषाः समाकुलास्त्वीर्थ इवार्थिवृन्दैः।"[29]

नेताजींच्या तपश्चर्येमुळे भारताला जरी ताबडतोब स्वातंत्र्य मिळाले नसले तरी स्वातंत्र्य-प्राप्तीमध्ये त्यांचा वाटा मोलाचा आहे हे मान्य करावेच लागेल. नेताजींच्या तेजस्विता आणि साहस या गुणांचे दर्शन त्यांच्या चरित्रावरून घडते. कवीने त्यांना "धैर्याचा मेरु " म्हटले आहे.[30] नेताजींचे जीवन आरंभापासून अखेरपर्यंत प्रखर राष्ट्रभक्तीने परिपूर्ण आहे. क्रांतिकारकांना स्फूर्तिप्रद आहे.

भारतीय राष्ट्रीय क्रांती विश्वातील पूर्वकालीन अनेक क्रांतींनी प्रभावित झालेली होती. रशियासारख्या विशाल देशावर जपानसारख्या छोटया देशाने मिळविलेला विजय भारतीयांना उत्साह देणारा ठरला. प्रेरक ठरला.[31]

लाला लजपतरायांचा लाठी हल्ल्याने झालेला मृत्यू आणि त्याचा बदला म्हणून भगतसिंहांनी सॅन्डर्सचा केलेला वध अशा अनेक क्रांतिकारक घटना तसेच कॉंग्रेसच्या स्थापनेपासून (इ.स.1885 ते 1947) पर्यंतच्या प्रमुख घटनांचा आढावा "राष्ट्रसभा" पर्वात घेतला आहे.

15 ऑगस्ट 1947 रोजी "युनियन जॅक" चे अवतरण आणि "तिरंगी ध्वजाचे" आरोहण झाले. सुखदु:खमिश्रित अनुभवांचे कवीने सुरेख शब्दांकन केले आहे.

"लोका जहर्षुः सकलास्तदानीं स्वातन्त्र्यलाभेन चिरेप्सितेन ।
सुज्ञास्त्वखिन्दन् मेधदाराधनापहारादिकघोरवृत्तैः ।।
दिष्ट्यैवं प्रियभारते समुदितः स्वातन्त्र्यभास्वांस्तु हा ।
स ग्रस्तो वियआर्त हिन्दुरुदनै रक्तप्रवाहैस्तथा ।।" [32]

सहाव्या पर्वात पाकिस्तानच्या बाबतीत गांधीजींच्या धोरणांचा विचार आलेला आहे. पाकिस्तानला भारताने पैसे देण्याच्या संदर्भात, मुसलमानांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांच्या संदर्भात, नथुराम गोडसेने गांधींच्या केलेल्या हत्येसंदर्भात तर्कपूर्ण विचार कवीने मांडले आहेत.

अशा प्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास सांगणारे हे काव्य आद्यन्त राष्ट्रभावनेने परिपूर्ण आहे.

## – क्रान्तियुध्दम् (1857) –

**पं.वासुदेवशास्त्री बागेवाडीकर.**

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास "क्रांतियुध्द" या नावाने ओळखला जातो. 1857 च्या क्रांतियुध्दाच्या शताब्दिमहोत्सवाच्या निमित्ताने सन 1957 मध्ये श्री वासुदेवशास्त्री बागेवाडीकर यांनी हा भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास "क्रांतियुध्दम् (1857)" या गद्य पुस्तकात लिहिला आहे.

इतिहासतज्ज्ञांच्यात 1857 च्या उठावाला "स्वातंत्र्ययुध्द" म्हणावे की नाही याविषयी मतभेद आढळून येतात. काहींच्या मते असंतुष्ट, क्रोधाविष्ट अशा राजे, संस्थानिकांनी आपल्या हक्कांवर, सत्तेवर होणा-या इंग्रजांच्या आक्रमणाविरूध्द केवळ स्वार्थी वृत्तीने पुकारलेले बंड होते. त्यामुळे संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्याचा विचार त्यांना अभिप्रेत नाही. केवळ स्वत:ची राजसत्ता अबाधित ठेवण्याचाच त्यांचा हेतू होता. तर काहींचे म्हणणे स्वधर्मरक्षणार्थ प्रवर्तित झालेले ते क्रांतियुध्द होते. इतिहासतज्ज्ञ काय म्हणतात ? किंवा त्यांच्यातील मतभेदांशी आपल्याला काहीच कर्तव्य नाही.

श्री. बागेवाडीकरांनी 1857 च्या या उठावाला स्वातंत्र्यासाठी केलेले क्रांतियुध्द म्हटलेले आहे. स्वार्थासाठी का होईना काही लोक एकत्र आले आणि त्यांनी इंग्रजांविरूध्द पहिला लढा दिला या घटनेला महत्त्व आहे. आपल्या स्वत्त्वाची जाणीव होणे, स्वातंत्र्यासाठी बंड पुकारणे या स्वार्थी जाणीवेतूनच, या क्रांतीच्या ठिणगीतून पुढे संपूर्ण स्वातंत्र्ययज्ञाच्या ज्वाला भडकलेल्या दिसून येतात. त्यामुळे या उठावालादेखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. पुढील काळातील क्रांतिकारकांना या उठावापासून प्रेरणा मिळाली, सामर्थ्य मिळाले तर या उठावातील चुका जाणून त्या दुरुस्त करण्याची संधी मिळाली. तेव्हा "क्रांतियुध्द 1857" या पुस्तकाचे महत्त्व देखील मान्य करावेच लागते.

1857 मध्ये नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झांशीची राणी वगैरेंनी इंग्रज सरकारविरूध्द जो बंडाचा झेंडा उभारून स्वधर्माचे रक्षण करण्याचा जो प्रयत्न केला, त्या स्वातंत्र्याच्या क्रांतियुध्दाचा इतिहास संस्कृतमध्ये लिहून श्री. बागेवाडीकरांनी संस्कृत वाचकांच्या मनात या क्रांतिकारकांविषयी श्रध्दा, अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

शत्रुपक्षीय असून देखील इंग्रजांनी मुक्तकंठाने ज्यांच्या धैर्यशौर्यादि गुणांची स्तुती केली त्या क्रांतिकारकांचा हा इतिहास लिहून श्री. बागेवाडीकरांनी श्रध्दांजली अर्पण केली आहे. या क्रांतियुध्दा-तील वीरांमध्ये काही दोष असतीलही, की ज्यामुळे त्यांना यशप्राप्ती झाली नाही. कदाचित स्वार्थासाठीही त्यांनी बंड पुकारले असेल, परंतु त्यांच्या ठिकाणी असलेला स्वधर्माभिमान, स्वराज्याभिमान, मातृभूमीवरील निष्ठा, प्रेम नजरेआड करता येणार नाही. स्वधर्मविलोपाच्या भयाने त्यांची अंत:करणे व्याकुळ झाली नव्हती, असे कसे म्हणता येईल ? त्या सर्वांच्या बलिदानांचा काहीच उपयोग झाला नाही, असे म्हणू शकू का आपण ? या ग्रंथवाचनाने आमच्या मनात त्याग, सामर्थ्य, धर्मप्रेम आणि स्वराज्याची आकांक्षा निश्चितच निर्माण होते. त्यादृष्टीने हा इतिहास राष्ट्रीय चैतन्य निर्माण करणारा आहे. यात तीळमात्र शंका नाही.

या ग्रंथलेखनाचा हेतू प्रस्तावनेत बागेवाडीकरांनी स्पष्टच सांगितला आहे. "संस्कृत भाषाया: सेवा, स्वातन्त्र्यरणयज्ञे स्वप्राणानपि सुखं जुह्वतां वीरपुरूषाणां गुणसंकीर्तनं, इति हेतुध्दयम् अस्य लेखने वर्तते ।[33]

"क्रान्तिबीजम्" या पहिल्या प्रकरणात श्री. बागेवाडीकरांनी सुरुवातीलाच पराधीनतेची दु:खे सांगितली आहेत. पौरूषाने युक्त असूनही पुरूष अपौरूषेय वाटतात. त्यांचा पराक्रम व्यर्थ ठरतो. ते निस्तेजक ठरतात. मानहीन, परतंत्र माणसाच्या बाबतीत धर्म, लक्ष्मी आणि यश अप्राप्य असते. जिथे परवशता असते अधर्मता,अन्याय्यता पसरते. दास्यत्वामध्ये मनुष्य आत्मोध्दार देखील करू शकत नाही. मग इतरांचा किंवा राष्ट्राचा उध्दार कसा करू शकेल ?[34]

राणी लक्ष्मीबाईच्या मृत्युचे वर्णन करताना या प्रकरणाच्या शेवटी लक्ष्मीबाईविषयी लेखक अभिमानाने म्हणतो- " जगामध्ये भारतीय रमणींची प्रतिष्ठा राणी लक्ष्मीबाईंनी वाढविली आहे. क्रोधित भारतीय ललना प्राणाचे मूल्य देऊनही यश मिळवितेच.[35]

स्वातंत्र्ययुध्द संपले पण त्याची स्मृती नाही संपली.हे स्मरण सर्वदेशवासियांना पुण्यप्रद आहे. मृतांमध्ये देखील चैतन्य निर्माण करणारे, आळशी लोकांच्या बाबतीत उत्साहवर्धक आहे.[36]

शेवटी उपसंहारात श्री.बागेवाडीकर म्हणतात- " पारतन्त्र्यसुवर्णपञ्जरात् स्वातन्त्र्य-पर्णशाला वरम् ।" हे जे जाणतात, जे स्वातंत्र्यासाठी सुख,स्वार्थ,प्राणांचादेखील त्याग करतात ते अत्यंत धन्य होत ।

## - भारतीय राज्यघटनेचा संस्कृतानुवाद -

भारतीय स्वातंत्र्येतिहासाची सांगता स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र प्रजासत्ताक भारताची राज्यघटना इंग्लिशमधून लिहिली. त्यानंतर लवकरच म्हणजे इ.स.1952 मध्ये राज्यघटनेचा संस्कृतानुवाद केला गेला. स्वातंत्र्योत्तर काळांत, राष्ट्रीय चैतन्य निर्माण करणा-या संस्कृत साहित्याचा विचार करताना राज्यघटनेच्या संस्कृतानुवादा-सारखी महत्त्वपूर्ण घटना नजरेआड करताच येणार नाही. भारतीय स्वातंत्र्येतिहासातील अंतिम भाग म्हणूनही या राज्यघटनेला अत्यंत महत्त्व प्राप्त होते आणि म्हणूनच स्वातंत्र्येतिहासाचे वर्णन करणा-या काव्यांच्या अखेरीस राज्यघटनेच्या संस्कृतानुवादाविषयी लिहिणे उचित वाटते.

राज्यघटनेचा संस्कृतानुवाद करण्यामागे हेतू कोणता असावा ? असा प्रश्न पडतो. कारण स्वतंत्र भारताची राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला तर राजभाषा म्हणून इंग्रजीला राज्यमान्यता मिळालेली आहे. त्यामुळे इंग्रजी राज्यघटनेच्या फार तर हिंदी अनुवादाची आवश्यकता लक्षात येण्या-जोगी आहे. परंतु संपूर्ण भारतात अल्प प्रमाणात का होईना पण संस्कृतचा वाचकवर्ग आहे. संस्कृत-प्रेमी वाचकांसाठी संस्कृताभिमानी व्यक्तींनी राज्यघटनेचा संस्कृतानुवाद करून आपली संस्कृतनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा व्यक्त केली आहे.

यामध्ये आणखी एक महत्त्वाची उल्लेखनीय गोष्ट आहे ती अशी, की या अनुवाद समितीचे सभापती हे महाराष्ट्रातीलच आहेत. त्यांच्याशिवाय आणखी तीन सभासद महाराष्ट्रातील असून या अनुवादाची छपाईदेखील महाराष्ट्रातीलच प्राज्ञपाठशाळा मंडळ,वाई येथे केली गेली आहे. ही गोष्ट आम्हा महाराष्ट्रीयनांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहे. म्हणूनच येथे राज्यघटनेच्या संस्कृतानुवादाविषयी थोडी माहिती लिहित आहे.

या कामासाठी नियुक्त केली गेलेली समिती पुढीलप्रमाणे:-

1. म.म.पाण्डुरंग वामन काणे (मुंबई) - सभापती
   एम.ए.एल.एल.एम.
2. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी(वाई) - अनुवादक
   धर्मकोशाचे प्रधान संपादक
3. डॉ.मंगलदेवशास्त्री (बनारस) - अनुवादक
   एम.ए.डी.फिल.

4. डॉ.सुनीतिकुमार चतर्जी (कलकत्ता) - सभासद
एम.डी.लिट्(लंडन)

5. श्री.के.बालसुब्रह्मण्यम् अय्यर(मद्रास) - सभासद
बी.ए.बी.एल. ॲडव्होकेट

6. म.म.गिरिधरशर्मा चतुर्वेदी (बनारस) - सभासद
डायरेक्टर संस्कृत स्टडीज,हिंदू युनिव्हर्सिटी,बनारस

7. डॉ.बाबूराम सक्सेना (अलाहाबाद) - सभासद
एम.ए.डी.लिट्.

8. पं.राहुल सांकृत्यायन (मसूरी) - सभासद

9. डॉ.रघुवीर (नागपूर) - सभासद

10. श्री.मुनिजिनविजयजी (मुंबई) - सभासद
डायरेक्टर भारतीय विद्याभवन,मुंबई

11. डॉ.कुन्हनराजा (मद्रास) - सभासद

या अकरा सदस्यांच्या समितीने भारतीय राज्यघटनेचा " भारतस्य संविधानम्" हा संस्कृतानुवाद केला. या संविधानाचे 22 भाग असून 295 पृष्ठे, 395 अनुच्छेद आहेत.

संविधानातील पूर्वार्धाचे भाषांतर (अनुच्छेद 1 ते 263) श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तर अनुसूचीसह उत्तरार्धाचे भाषांतर श्री.मंगलदेवशास्त्री यांनी केले. संविधान संशोधन अधिनियमांचे भाषांतर देखील श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे.

हे भाषांतर इंग्रजी संविधानाचे शब्दशः वाक्यशः इतकेच नव्हे तर वाक्यखंडशः केले

या संविधानाची प्रस्तावना पुढीलप्रमाणे आहे-

" वयम् भारस्य जनाः भारतं संपूर्ण प्रभुत्व संपन्नं लोकतन्त्रात्मकं गणराज्यं विधातुम् तस्याखिलनागरिकांश्च सामाजिकमार्थिकं राजनीतिकं च न्यायम्;विचारस्याभिव्यक्तेः श्रध्दाया धर्मस्य पूजा-नुष्ठानस्य च स्वतन्त्रताम्;प्रतिष्ठाया अवसरस्य च समताम् ;प्रापयितुम् ;तेषु च सर्वेषु व्यक्तिगौरवस्य राष्ट्रैक्यस्य च समाश्वासयित्रीं भ्रातृभावनां विधर्धयितुम ;कृतदृढसंकल्पा अस्यामस्मदीयायां संविधानसभायामद्य ख्रिस्तीये 1949 तमे वत्सरे नवम्बरमासस्य 26 तमे दिवसे (2006 तमे विक्रमसंवत्सरे मार्गशीर्ष शुक्लपक्षे

तिथौ) एतेनेदं संविधानं स्वीकुर्महे ऽधिनियमयामहे ऽत्मभ्यं च समर्पयामहे । "

या राज्यघटनेच्या अनुवादामध्ये इंग्रजी शब्दांसाठी काही संस्कृत पारिभाषिक शब्द दिले आहेत, की जे भारतात सर्वत्र तेच वापरले जातील. एका शब्दाच्या अर्थाने अनेक संस्कृत शब्द आढळतात पारिभाषिक शब्द देण्यामागे सर्वत्र एकत्व साधावे हाच हेतू असावा. असे पारिभाषिक शब्द पुढे देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | *Condition* | – शर्त | – प्रतिबन्धः |
| 2. | *Sanction* | – मंजूरी | – स्वीकृतिः |
| 3. | *enquiry* | – जाँच | – परिपृच्छा |
| 4. | *recommendation* | – सिपारिश | – पुरःप्रशंसनम् |
| 5. | *rate* | – दर | – अर्घः मानं वा |
| 6. | *factory* | – कारखाना | – कर्मान्तम |
| 7. | *assets* | – आस्तियाँ | – सर्वस्वम् |
| 8. | *title* | – हक | – स्वत्त्वम् |
| 9. | *insolvent* | – दिवालिया | – ऋणशोधनाशक्तः |
| 10. | *employment* | – नौकरी | – नियोजनम् |
| 11. | *agreement* | – करार | – समयः |
| 12. | *benefit* | – फायदा | – हितम् |
| 13. | *claim* | – दावा | – अध्यर्थना ममत्त्वावेदनं वा |
| 14. | *preparation* | – तैयार करना | – परिकल्पनं राज्जीकरणंवा |
| 15. | *interest* | – व्याज | – वृध्दिः |

राज्य घटनेनंतर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वच शालेय पाठयपुस्तकांच्या सुरवातीला येणारी प्रतिज्ञा. संस्कृत पाठयपुस्तकांमध्ये देखील ही प्रतिज्ञा संस्कृतमधून दिलेली आहे– " भारत हा माझा देश आहे आणि मी भारताचा नागरिक आहे. याचा मला अभिमान असला पाहिजे. माझ्या देशातील संस्कृतीचा आणि परंपरांचा मी अभिमान बाळगायला हवा. देशाच्या उत्कर्षासाठीच माझे जीवन आहे." ही भावना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण करण्यासाठी प्रतिज्ञा ही अतिशय उपयुक्त ठरते. भारत आणि भारतीयता या विषयी विद्यार्थ्यांच्यामध्ये आदर, प्रेम, श्रध्दा आणि निष्ठा निर्माण करून राष्ट्रीय भावना वृध्दिंगत करण्याच्या कामी ही प्रतिज्ञा निश्चितच उपयोगी पडते.

## तत्त्वदर्शनपर काव्ये

स्वातंत्र्यप्राप्तीच्या कालावधीत व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही पुष्कळशा लोकांच्या मनावर गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा प्रभाव पडलेला होता. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी गांधींनी जो सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला होता. त्या मार्गाविषयी भारतीयांच्याच नव्हे तर परकीय लोकांच्या मनांत देखील आदर होता. श्रध्दा होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे संस्कृत साहित्य निर्माण झाले, त्यामध्ये गांधींच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारे साहित्य निर्माण झालेले दिसून येते. अशा तत्त्वज्ञानावर गांधिनिष्ठ साहित्याचा परामर्श येथे घेत आहे.

### – गान्धिगीता –

श्री.श्रीनिवास ताडपत्रीकर

परिचय– श्रीमद्भगवद्गीतेच्या अनुकरणाने लिहिलेल्या " गान्धिगीता" या काव्याची रचना वास्तविक सन 1932 मध्येच झाली होती. या काव्यातील 18 अध्यायात गांधींच्या राजनीतीवर प्रकाश टाकलेला आहे. त्याचप्रमाणे गांधीजींच्या अहिंसा–सत्याग्रहापासून गोलमेज परिषदेपर्यंत तसेच पुणे समझोता अलाहाबाद सम्मेलन यातील राजनैतिक घटनांचा कवीने उपयोग करुन घेतला आहे, परंतु 1948 मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या मृत्युनंतर हे पुस्तक प्रकाशित करीत असता 1933 पासून 1948 पर्यंतच्या राष्ट्रीय घटनांचे वर्णन 6 अध्यायात करुन 24 अध्यायांची ही गीता 1949 मध्ये प्रकाशित झाली. यामध्ये 1087 श्लोक आहेत. सुरवातीच्या 14 श्लोकांमध्ये प्रतिपाद्य विषयाचा परिचय करुन दिला आहे.

या काव्यामध्ये गांधीजींच्या राजनैतिक तत्त्वांचे वर्णन असल्याने आणि गांधीजींचे केवळ स्मरणदेखील राष्ट्रीय चैतन्य निर्माण करणारे असल्याने या काव्यात राष्ट्रभावना ओतप्रोत भरल्या आहेत. कवीची गांधिनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि उज्ज्वल राष्ट्रीय भावना यांचे चित्रण या काव्यात केलेले दिसते. कवी श्री.ताडपत्रीकर यांनी राष्ट्रधर्माचे पालन करण्याची प्रेरणा या काव्यातून दिलेली आहे.

कवीच्या मते व्यक्ती जेथे जन्म घेते, जेथे लहानाची मोठी होते, तेच तिचे राष्ट्र असते. त्याचप्रमाणे व्यक्तीचे मातापिता जेथील असतात, ते तिचे राष्ट्र असते.[37] आणि म्हणूनच ज्याप्रमाणे आपण मातापित्यांचा, परमेश्वरांचा आदर करतो, सेवा करतो त्याप्रमाणे राष्ट्राचा देखील आदर केला पाहिजे, सेवा केली पाहिजे. जेव्हा राष्ट्राच्या उध्दारासाठी आपण कार्यरत होतो, तेव्हाच स्वत:ला राष्ट्रीय

म्हणवून घेऊ शकतो. आपल्याला आपल्या राष्ट्राची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवायची आहे. आपल्या राष्ट्रात अंतर्गत कलहाला मुळीच थारा देता कामा नये. कारण त्यामुळे राष्ट्र दुर्बल आणि पराधीन होते.[38]

आपल्या राष्ट्राच्या गौरवाचे आपण रक्षण केले पाहिजे. राष्ट्रधर्माचे पालन केले पाहिजे. त्याशिवाय राष्ट्र समृध्दशाली बनणार नाही. विश्वामध्ये जी जी राष्ट्रे समृध्द आहेत त्या सर्व राष्ट्रांमध्ये सर्व लोक राष्ट्रधर्माचे निष्ठेने पालन करताना दिसून येतात. म्हणूनच व्यक्तिगत धर्मापेक्षा जातीय धर्म श्रेष्ठ आणि जातीय धर्मापेक्षा राष्ट्रधर्म श्रेष्ठ आहे.[39]

स्पृश्यास्पृश्यभेदभावाविषयी कवीचे मत मननीय आहे. आपण एकीकडे आपल्याच देशवासीयांचा तिरस्कार करतो आणि दुसरीकडे विदेशी लोकांची स्तुती करतो. इकडे आपल्याच काही बांधवांचा स्पर्शच काय सावलीचा स्पर्शदेखील आपल्याला खपत नाही. तेच आपण विदेशी लोकांच्या सहवासात रमतो, त्यांच्याबरोबर खातो-पितो,आणि हे करण्यात आपण स्वत:ला धन्य मानतो.यामध्ये स्वत:चा सन्मान समजतो आणि या भेदभावामुळेच राष्ट्राची अवनती होते हे आपण लक्षात घेत नाही. म्हणूनच ताडपत्रीकर म्हणतात- भारतराष्ट्रामध्ये निवास करणाऱ्या सर्व व्यक्तींना समान दर्जा, मान सन्मान मिळाला पाहिजे तेव्हाच राष्ट्रीय पुरूषार्थ सर्वांगीण स्वास्थ टिकून राहू शकेल.[40]

राष्ट्राच्या शत्रूची उपेक्षा केव्हाही करू नये.जेवढ्या लवकर शक्य असेल तेवढा त्याचा नाश केला पाहिजे. आपण व्यक्तिवादींची निंदा आणि राष्ट्रवादींची प्रशंसा केली पाहिजे. आपल्या राष्ट्रात ऐक्य निर्माण करून भेदक आचरणापासून राष्ट्राचा बचाव केला पाहिजे. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी हसतमुखाने त्रास सहन केला पाहिजे.[41]

इथे राहणाऱ्या हिंदू मुसलमानांनी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असले पाहिजे. आपल्यातील धर्मभेदाला फाटा दिला पाहिजे. जेव्हा आपण सर्व एक होऊ तेव्हाच राष्ट्राचा उध्दार होईल.[42] आपण आस्तिक असा किंवा नास्तिक असा,राष्ट्रधर्माला आपलेसे करून त्याचे पालन केलेच पाहिजे.[43]

जरी ही सर्व आचारसंहिता स्वातंत्र्यपूर्वकाळातील भारतीयांना सांगितली असली तरी अंतर्गत भेदभावांनी पोखरल्या जात असलेल्या सर्वच भारतीयांना आजही ती अत्यंत उपयुक्त आहे, अनुसरणीय आहे. जातीय,प्रांतीय भेदभाव विसरून या वरील तत्त्वांना अनुसरून आपण एकजुटीने राहिलो तरच आपले स्वातंत्र्य अबाधित राहील. आपण आपली उन्नती साधू शकू आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाला काही स्थान प्राप्त करून देऊ शकू.

भारताच्या प्राचीन परंपरांचा गौरव करण्याच्या प्रसंगी येथील शील,शक्ती आणि विद्वत्ततेची प्रशंसा कवीने केलेली आहे.[44] भारतीय जनतेच्या मनात आत्मगौरवाची भावना जागृत करुन प्राचीन भारतीय संस्कृतीविषयी कवीने प्रेमादर निर्माण करण्याचे काम केले आहे. येथील संपत्तीचा स्वाभिमान व्यक्त केलेला आहे.[45]

पारतंत्र्याच्या कारणांची चर्चादेखील या काव्यामध्ये श्री ताडपत्रीकरांनी केलेली आहे. त्याचप्रमाणे पारतंत्र्याच्या परिणामांचेही वर्णन केले आहे. पराधीन राष्ट्रातील प्रजेचे जीवन शुध्द राहत नाही. पारतंत्र्यात आपल्या धर्म,संस्कृतीचा विनाश होतो. प्रजेच्या मनातील स्वाभिमानाच्या भावना नाहीशा होऊ लागतात. राष्ट्रीय भाषा,ज्ञान,विज्ञान,कला यांचा विनाश होऊन राष्ट्राचे सर्वांगीण अध:पतन होते. म्हणून राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत सर्वांनी नेहमी सावध असले पाहिजे. एकजुटीने राहिले पाहिजे.[46]

श्री ताडपत्रीकरांनी गान्धिगीतेत इंग्रजांच्या कुटिल राजनीतीवरदेखील प्रकाश टाकलेला आहे. हिंदू मुस्लीम वैमनस्य निर्माण करुन भारताचे इंग्रजांनी दोन तुकडे केले. त्यामुळे झालेले अत्याचार, रक्तपात यांचेही वर्णन केलेले आहे.[47]

भारतभूमीला पारतंत्र्यापासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न केलेल्या,बलिदान दिलेल्या देशभक्तांचे आणि त्यांच्या राष्ट्रकल्याणाच्या कार्याचे उल्लेख करुन आपला आदर व्यक्त केलेला आहे.[48]

गान्धिगीता या काव्यामध्ये आलेली काही राष्ट्रीय सुभाषिते व त्यांचा भावार्थ पुढीलप्रमाणे -

"ऐक्याद् बन्धस्य निर्मुक्तिस्तदैक्यं किं न सेव्यते ?"[49]

एकीमुळे स्वातंत्र्य मिळेल,म्हणून त्या ऐक्याचेच का सेवन करीत नाही ?

"वन्दे मातरमित्येव राष्ट्रमन्त्र: सनातन: ।"[50]

"वंदे मातरम्" हा आपला सनातन राष्ट्रमंत्र आहे.

"पारतन्त्र्ये ह्यनर्थानां जायते हि परम्परा ।"[51]

पारतंत्र्यामध्ये संकटांची परंपरा सुरु होते.

"यथा माता तथा राष्ट्रं यथा सर्वेश्वरोऽपि वा ।<br>प्रेम्णादरेण सेव्यश्च धर्म एष सनातन: ;"[52]

राष्ट्र मातेप्रमाणे किंवा ईश्वराप्रमाणे असते. म्हणून त्याची सेवा प्रेमाने आणि आदराने केली पाहिजे. हा सनातन धर्म आहे.

"राष्ट्रोध्दारे यत्नपरा राष्ट्रीया: सर्व एव ते ।"[53]

जे राष्ट्राच्या उध्दारात मग्न असतात, त्या सर्वांना राष्ट्रीय म्हणतात.

"कलहं वै स्वकीयेषु नैव कुर्यात्कदाचन ।
कलहो राष्ट्रनाशाय भवतीति सुनिश्चितम् ।।"[54]

स्वकीयांशी केव्हाही, कोणीही कलह करू नये. कलहामुळे राष्ट्राचा नाश होतो.

"राष्ट्रच्छिद्रं हि कलहो मूले तं प्रशमं नयेत् ।"[55]

कलह राष्ट्राची दुर्बलता आहे. म्हणून तो मुळापासून नष्ट करावा.

"एकधर्मेण सम्बध्दा जन्मभूम्या विहारिण: ।
सर्वे वयं हिन्दपुत्रा: संभूयैव यतामहे ।।"[56]

जन्मभूमीमध्ये राहणारे आम्ही सर्व एकाच धर्माने बांधले गेलो आहोत. आपण सर्व हिंदपुत्र आहोत. आपण सर्व एकीने, मिळून मिसळून राष्ट्रहितासाठी प्रयत्न करू या.

" राष्ट्रकार्यार्थमैक्यं हि सर्वेषां सुखदायकम् ।[57]

राष्ट्राच्या हितार्थ एकीने राहण्यातच सर्वांचे सुख आहे.

" व्यक्तिधर्माज्जातिधर्मो राष्ट्रधर्मस्ततो महान् ।"[58]

व्यक्तिधर्मापेक्षा जातिधर्म मोठा आहे, जातिधर्मापेक्षा राष्ट्रधर्म श्रेष्ठ आहे.

" राष्ट्रधर्मे तु भेदनाम्नव काशो न विद्यते ।[59]

राष्ट्रधर्मामध्ये भेदभावाला जागा नसते.

" समाना बन्धव: सर्वे जन्मभूमिनिवासित: ।"[60]

जन्मभूमीमध्ये राहणारे सर्व बांधव समान असतात.

" राष्ट्रकार्यपरा बुध्दि: कर्तव्या त्यागशालिनी।"[61]

स्वार्थत्याग करुन आपल्या बुध्दीला राष्ट्रकार्यात गुंतवावे.

" ऐक्ये सिध्दे हि राष्ट्रस्य कोऽन्यस्तद् धर्षयिष्यति ।"[62]

राष्ट्रात जर ऐक्य असेल तर कोण त्याला जिंकेल ?

" अखण्डं भारतं वर्षं तिष्ठतु । "[63]

भारतवर्ष अखंड राहो.

## - अपूर्व: शान्तिसंग्राम:

**- श्री. विश्वनाथ के. छत्रे**

पाच दृश्यांमध्ये गुंफलेली ही एक एकांकिका आहे. महात्मा गांधींनी मिठाचा कायदा तोडण्यासाठी केलेल्या दांडीयात्रेच्या प्रसंगाला धरुन " अपूर्व: शान्तिसंग्राम:" ही एकांकिका श्री. विश्वनाथ छत्रे यांनी लिहिली आहे. गांधीजींच्या अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांचा पुरस्कार करण्यासाठी ही एकांकिका लिहिली आहे.

या छोटयाशाच कथावस्तूमध्ये अजीव राष्ट्रभावना आहे. आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य कल्याण, गौरव आणि अभ्युदयासाठी तत्पर राहण्याचा संदेश या एकांकिकेतून मिळतो. जागरुकता, तपस्या, सेवा, साहस आणि त्यागाची प्रेरणा मिळते. राष्ट्र आणि राष्ट्रभक्तांचा सन्मान करण्याची सामान्य जनतेची भावना व्यक्त होते. सर्वसामान्य लोकांच्या मनात राष्ट्रीय भावना विकसित करण्याच्या दृष्टीने या एकांकिकेला अत्यंत महत्त्व आहे.

केवळ पाच पात्रांच्या भोवतीच कथानक गुंफलेले आहे. देशभक्तांचा भक्त विठ्ठल हा एक शेतकरी आहे. लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर आपल्या देशनायकाची जबाबदारी कोणावर येणार ? या देशाची धुरा कोण वाहणार ? याची त्याला चिंता आहे. परंतु देशभक्त वकील भाऊराव त्याला गांधींच्या कर्तृत्वाविषयी ग्वाही देतात. स्वराज्यप्राप्तीसाठी तेच समर्थ असल्याचे सांगतात. भाऊरावांची पत्नी सामान्य सांसारिक स्त्री आहे. तर त्यांची मुलगी उज्जवला ही देखील देशभक्त आहे." इंग्रजी शासनातील शिक्षणावर बहिष्कार" चळवळीत ती सामील आहे. या बापलेकींची भारतीय शाळा उघडण्याची योजना आहे. मात्र त्यांचा मुलगा माधव सशस्त्र क्रांतीचा पुरस्कर्ता आहे. भाऊरावांनी सत्याग्रहाच्या प्रभावामुळे आपली वकिली सोडली आहे.

मिठाचा कायदा तोडण्यासाठी दांडीयात्रेत भाऊराव सामील होतात. त्यांचा उत्साह अपूर्व आहे.

चौथ्या दृश्यामध्ये उज्ज्वला वर्तमानपत्रात आलेली सत्याग्रहींची दिनचर्या, कायदेभंगाची कार्य पध्दती, त्याचे परिणाम, इंग्रज सरकारने केलेले क्रूर अत्याचार आणि सत्याग्रहींची झालेली वाढ यांची वर्णने आईला वाचून दाखविले. त्यावेळी तिथे आलेल्या विठ्ठलाच्या भावना पाहून वाचक प्रेक्षकांच्या मनात नक्कीच राष्ट्रीय चैतन्य निर्माण होते. देशभक्तांविषयीचा आदर अभिमान दुणावतो.

"मूर्ती लहान पण कीर्ती महान" या उक्तीनुसार अत्यंत लहान अशा या साहित्य कृतीमधून लेखकाच्या गांधीनिष्ठ राष्ट्रप्रेमाची ग्वाही पटते.

## – श्रमगीता –

### डॉ.श्री.भा.वर्णेकर

गीतेच्या शैलीमध्ये लिहिलेले " श्रमगीता" हे 118 श्लोकांचे काव्य डॉ.श्री.भा. वर्णेकर यांनीलिहिले आहे. हे काव्य उपदेशात्मक आहे. इंग्रजांच्या दास्यातून मुक्त होऊन देखील भारतीयांची दरिद्रता, दीनता, अभावग्रस्तता पाहून दु:खी झालेले पंतप्रधान नेहरू, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, उपराष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन्, उपपंतप्रधान वल्लभभाई पटेल आणि राजगोपालचार्य हे सगळे म.गांधीकडे जातात व भारताच्या सर्वांगीण प्रगतीचा मूलमंत्र विचारतात.तेंव्हा महात्मा सांगतात–

" जोपर्यंत समृध्द बनण्यासाठी भारतवासी स्वत: उत्साहाने श्रमशील होत नाहीत तोपर्यंत ते समृध्द होणार नाहीत. भारतवासियांनी इंग्रजांना घालवून देण्यासाठी जे परिश्रमपूर्वक कार्य केले त्यापध्दतीने विकासासाठी ते कार्य करीत नाहीत, हे स्पष्ट दिसत आहे. यासाठी ते सरकारकडून अपेक्षा ठेवतात.स्वत: श्रम करण्याची त्यांची वृत्ती नाही.त्यांनी स्वत: कष्ट केले पाहिजेत.कोणतेही राष्ट्र कितीही विशाल असले तरी जर तेथील जनता परावलंबी असेल,आळशी असेल तर ते राष्ट्र कधीही उन्नती प्राप्त करू शकणार नाही. या जगात त्याच राष्ट्रांचा उत्कर्ष होतो,की श्रमपूजा करतात.[64]

महात्मा गांधींच्या माध्यमातून कवीने व्यक्ती, समाज आणि राष्ट्र जीवनामध्ये श्रमांला असलेले महत्त्व प्रतिपादन केलेले आहे.अत्यंत प्रभावशाली भाषेमध्ये कवीने उपदेश केला आहे. की "आळस सोडून श्रमाची पूजा करणे" हाच खरा सार्वलौकिक धर्म आहे. श्रमाचा प्रभाव यज्ञ–याग, योग, जप–जाप्य याहून अधिक आहे. श्रमाने स्वर्गाची प्राप्ती होते. तर आळसामुळे नरकाची ! श्रमहीन, कधीही आणि कुठेही सुखी होऊ शकत नाही. माणसाच्या हिताचे, सुखाचे, वैभवाचे, उत्कर्षाचे, योगाचे, क्षेमाचे, स्वर्गाचे, मोक्षाचे श्रम हेच साधन आहे. श्रमदान हे सर्व दानांमध्ये श्रेष्ठ आहे. गंगाजलापेक्षाही शेतक–यांच्या घामाचे जल अधिक पवित्र आहे. म्हणूनच व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या हितासाठी, विकासासाठी आपण श्रमशील बनले पाहिजे.[65]

हे काव्य लिहिण्यामागे कवीचा भारतीय जनतेला श्रमाचे माहात्म्य पटवून देण्याचाच हेतू दिसून येतो. आपल्या राष्ट्राच्या उन्नतीसाठी आपण सर्वांनी एकजुटीने श्रम केले पाहिजेत. श्रमांची पूजा केली पाहिजे. हेच कवीचे आवर्जुन सांगणे आहे. या काव्यातून श्री.वर्णेकरांची राष्ट्रहिताची तळमळ राष्ट्राच्या कल्याणाची, उत्कर्षाची त्यांची आस स्पष्ट होते.

## – उत्तरसत्याग्रहगीता –

**पं.क्षमा राव**

गांधींच्या सत्याग्रह आंदोलनामुळे पंडिता क्षमा राव अत्यंत प्रभावित झाल्या होत्या. सत्याग्रह आंदोलनामध्ये सहभागी होण्याची त्यांची इच्छा होती. राष्ट्रासाठी काही करण्याची तळमळ होती. परंतु गांधीजींनी त्यांना अनुमती दिली नाही. मात्र त्यांचे राष्ट्रप्रेमी मन त्यांच्या साहित्य-कृतीत प्रतिबिंबीत झालेले दिसून येते. सत्याग्रह लढयात त्या स्वत: सहभागी झाल्या नसल्या तरी त्याचे स्वरूप त्यांनी जवळून पाहिले होते. गांधीजींच्या या सत्याग्रहलढयाचे वर्णन करणारी "सत्याग्रह-गीता" त्यांनी लिहिली. त्याचप्रमाणे गांधीजींचे जीवन,भारतीय राष्ट्रीय जीवन आणि स्वातंत्र्यसंग्रामाचे वर्णन करणारी " उत्तरसत्याग्रहगीता" लिहिली. यामध्ये भारतीय राजनैतिक,सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे विवरण असून त्याबरोबर गांधीजींच्या आणि अनेक महापुरूषांच्या मुलाखती,गांधीजींची भाषणे आणि पत्रे यांचीही माहिती आहे. या काव्यावर "श्रीमद्भगवद्गीतेचा" प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. 47 अध्याय आणि 1989 श्लोकात बध्द असलेली अशी ही "उत्तरसत्याग्रहगीता" अनेक राष्ट्रीय विचारांनी परिपूर्ण आहे. यावरुन क्षमा राव यांची गांधिनिष्ठ राष्ट्रनिष्ठा व्यक्त होते.

यामध्ये अंतर्भूत राष्ट्रीय सुविचार आणि त्याचे भावार्थ पुढीलप्रमाणे-

§ " वध्ययेयं स्वदेशं चेच्छिलाघातैर्हतैव माम् ।
न काप्यत्र घृणा कार्या वरं वैरी न वञ्चक : ।।"[66]

जर मी माझ्या देशाशी द्रोह करीन तर मला दगडांनी ठेचून मारावे. देशद्रोह्यावर दया करू नये.कारण शत्रू बरा पण देशद्रोही नको.

§ " जन्मभूमेः कृते सोढं शुभोदर्कं भविष्यति ।
मातुरर्थे सुपुत्रस्य क: क्लेशो दुस्सहो भवेत ।।"[67]

जन्मभूमीसाठी सोसलेल्या कष्टाचे फळ चांगलेच असते. आईसाठी सुपुत्र काय काय कष्ट सहन करीत नाही ?

§ " परायत्त प्रतिष्ठानां परसेवा परा गति: ।"[68]

पराधीन लोकांना दुस-यांची सेवा करावीच लागते.

§ "स्वयमेव स्वदेशस्य मा भूत क्षतिहेतव: । "[69]

आपल्या देशाचे स्वत:च नुकसान करू नये.

- " स्वराज्यादपि मे प्रेयो ह्यन्त्यजानां विमोचनम् "[70]

  स्वराज्यापेक्षाही हरिजनांचा उध्दार करणे मला अधिक प्रिय वाटते.

- "धिग्बलं भौतिकं पुंसां सत्याग्रहबलं बलम् ।"[71]

  भौतिक बलाचा धिक्कार असो. मनुष्याचे खरे बल सत्याग्रह आहे.

- "नाल्पीयसः समाजस्य भवदीयस्य केवलम् ।

  अपि त्वखिलराष्ट्रस्य श्रेयस्तावद्विचिन्त्यताम् ।।"[72]

  आपल्या छोटयाशा समाजाचा विचार करू नये. तर संपूर्ण राष्ट्राच्या हिताचा विचार करावा.

- "यावच्च ध्रियते राष्ट्रं भारतीयं क्षमातले ।

  तावद्गीतिः पताका च प्रोच्चैरुल्लसतो ध्रुवम् ।।"[73]

  जोपर्यंत या धरतीवर भारतराष्ट्र आहे,तोपर्यंत राष्ट्रगीत आणि राष्ट्रध्वज निश्चितपणे शोभून राहतील.

- "जन्मभूरस्मदीया हि प्रशान्तेर्धाम वर्तते ।"[74]

  आमची भूमी शांतीची भूमी आहे.

- "स्वातन्त्र्यंपरिच्छेद्यं विश्वभोज्यं हि वर्तते ।"[75]

  स्वतंत्रता सीमित होत नाही,ती सर्वांसाठी असते.

- "राष्ट्रस्य सार्वभौमता जनतामवलम्बते ।"[76]

  राष्ट्राची सार्वभौमता जनतेवर अवलंबून असते.

- "भारते ऽत्र निरातङ्का स्वातन्त्र्यश्रीर्विराजताम् ।"[77]

  भारतामध्ये स्वातंत्रता निर्भीड होऊन सुशोभित होवो.

## - संदर्भ -


| | | |
|---|---|---|
| 1. | भारतस्वातन्त्र्यम् | पृष्ठ 6 ते 8 |
| 2. | --"-- | पृष्ठ 11 ते 20 |
| 3. | --"-- | पृष्ठ 22 ते 32 |
| 4. | --"-- | पृष्ठ 41 ते 130 |
| 5. | --"-- | पृष्ठ 134 ते 137 |
| 6. | --"-- | पृष्ठ 151,152 |
| 7. | --"-- | मंगलाचरण पद्य 8 |
| 8. | --"-- | पृष्ठ 6 |
| 9. | --"-- | पृष्ठ 6 |
| 10. | --"-- | पृष्ठ 6 |
| 11. | --"-- | पृष्ठ 57 |
| 12. | --"-- | पृष्ठ 79 |
| 13. | --"-- | पृष्ठ 84 |
| 14. | --"-- | पृष्ठ 161 |
| 15. | स्वराज्यविजय: | 3/2 |
| 16. | --"-- | 15 / 15 ते 30 |
| 17. | --"-- | 7 / 3 |
| 18. | --"-- | 10 / 25 |
| 19. | --"-- | 10 / 24 |
| 20. | --"-- | 13 / 27,28 |
| 21. | --"-- | 14 / 34 ते 36 |
| 22. | --"-- | 15 वा सर्ग |
| 23. | --"-- | 26 वा सर्ग |
| 24. | --"-- | 13 / 30,31 |
| 25. | --"-- | 13 / 6 ते 24 |

| | | |
|---|---|---|
| 26. | भारतीय स्वातन्त्र्योदय: | 1 / 1 |
| 27. | --"-- | 1 / 2 ते 6 |
| 28. | --"-- | 2 / 43 |
| 29. | --"-- | 3 / 14 |
| 30. | --"-- | 4 / 18 |
| 31. | --"-- | 5 / 17 |
| 32. | --"-- | 6 / 14,15 |
| 33. | क्रान्तियुद्धम् | निवेदनम् |
| 34. | --"-- | पृष्ठ 1 |
| 35. | --"-- | पृष्ठ 72 |
| 36. | --"-- | पृष्ठ 72 |
| 37. | गान्धिगीता | 3 / 11,12 |
| 38. | --"-- | 3 / 15 ते 21 |
| 39. | --"-- | 10 / 1 ते 4 |
| 40. | --"-- | 3 / 5 ते 33 |
| 41. | --"-- | 3 / 34 ते 49 |
| 42. | --"-- | 3 / 55 ते 58 |
| 43. | --"-- | 12 / 18 ते 22 |
| 44. | --"-- | 14 / 1 ते 6 |
| 45. | --"-- | 17 वा अध्याय |
| 46. | --"-- | 17 / 1 ते 42 |
| 47. | --"-- | 19 / 1 ते 29,21 / 1 ते 57 |
| 48. | | 22 / 1 ते 16,23 / 1 ते 81 |
| 48. | --"-- | अध्याय 14 |
| 49. | --"-- | ध्यानम् पद्य 11 |
| 50. | --"-- | ध्यानम् पद्य 12 |
| 51. | --"-- | 2 / 20 |

| | | |
|---|---|---|
| 52. | --"-- | 3 / 15 |
| 53. | --"-- | 3 / 16 |
| 54. | --"-- | 3 / 18 |
| 55. | --"-- | 3 / 19 |
| 56. | --"-- | 3 / 55 |
| 57. | --"-- | 8 / 49 |
| 58. | --"-- | 10 / 4 |
| 59. | --"-- | 10 / 29 |
| 60. | --"-- | 10 / 30 |
| 61. | --"-- | 18 / 43 |
| 62. | --"-- | 18 / 66 |
| 63. | --"-- | 21 / 42 |
| 64. | श्रमगीता | 1 ते 30 |
| 65. | --"-- | 34 ते 115 |
| 66. | उत्तरसत्याग्रहगीता | 2 / 12 |
| 67. | --"-- | 2 / 15 |
| 68. | --"-- | 3 / 11 |
| 69. | --"-- | 6 / 6 |
| 70. | --"-- | 7 / 23 |
| 71. | --"-- | 13 / 36 |
| 72. | --"-- | 31 / 57 |
| 73. | --"-- | 32 / 31 |
| 74. | --"-- | 35 / 22 |
| 75. | --"-- | 36 / 29 |
| 76. | --"-- | 39 / 12 |
| 77. | --"-- | 47 / 20 |